

# चेशायर होमच्या विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

**मुंबई :** टाटा पॉवरची राष्ट्रीय चळवळ असलेल्या क्लब एनर्जीकडून ऊर्जा स्त्रोतांचे संवर्धन करण्याबाबत जनजागृती करणे आणि जबाबदार नागरिक घडवण्यासाठी तसेच युवा पिढीने नैतिक आणि नागरी मूल्यांचे पालन करावे, यासाठी विविध उपक्रम हाती घेतले जातात. याच बांधिलकीनुसार क्लब एनर्जीच्या विद्यार्थ्यांनी क्विन मेरी स्कूलच्या सहकार्याने चेशायर होमच्या अपंग विद्यार्थ्यांसाठी आपत्ती व्यवस्थापन या विषयावर जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. क्विन मेरी स्कूलच्या जवळपास ३५ विद्यार्थ्यांनी तसेच क्लब एनर्जीच्या १५ स्वयंसेवकांनी या उपक्रमात भाग घेतला होता. या उपक्रमाबद्दल टाटा पॉवरचे कार्यकारी संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल सरदाना यांनी सांगितले की, शारीरिक अपंगत्व असूनही चेशायर होममध्ये वास्तव्यास असलेली मुले सक्षम आणि वैयक्तिक आयुष्य जगत आहेत, हे पाहण्याचा अनुभव अभूतपूर्व होता.